| | | |
|---|---|---|
| HKO070016122024 | **किरकोळ दिवाणी अर्ज नं.४०/२०२४** | **श्री.मोहसीन इस्माईल मोदी**<br>**वि.**<br>**सिद्राम विरुपाक्ष हडपद** |

## निशाणी क्र.१२ खालील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांच्याविरुध्द केलेला विना म्हणणेचा आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करुन घेणेस परवानगी मागीतली आहे. अर्जदार यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत.

०२. वि.प. यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, सदर कामी त्याचेविरुध्द विना म्हणणे चा आदेश झालेला आहे. सदर कामी वि.प. हे मुदतीमध्ये त्यांचे म्हणणे सादर करणार होते. तथापि त्यांना त्यांच्या व्यवसायामुळे सतत बाहेर गावी जावे लागत असल्यामुळे त्यांना वेळेत त्यांचे वकीलांची भेट घेऊन म्हणणे सादर करता आले नाही. सदर कामी वि.प. यांनी कोणताही निष्काळजीपणा केलेला नाही. सबब, वि.प. यांचेविरुध्द झालेला विना म्हणणेचा हुकुम रद्द होवून सोबत दिलेले म्हणणे याकामी दाखल करुन घेणेविषयी विनंती वि.प. यांनी केलेली आहे.

०३. अर्जदाराने वि.प. यांच्या नि.क्र.१२ च्या अर्जास सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा किरकोळ अर्ज हा वादी यांचा दावा खारीज केल्यामुळे दाखल केला आहे. प्रस्तुत कामी वि.प. हे फार दिवसापुर्वी याकामी हजर झाले होते. त्यांनी दिलेले कारण योग्य नसून सदरचा अर्ज जास्तीत जास्त कॉस्ट रु.१०००/– सह नामंजूर करणेविषयी विनंती अर्जदार यांनी केलेली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरकामी वि.प यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने त्यांचे विरुध्द विना म्हणणे असा आदेश झालेला

आहे. सदर अर्जान्वये वि.प. यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना म्हणणे चा आदेश रद्द करून त्यांचे म्हणणे दाखल करुन घेणेविषयी विनंती केली आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा दावा फेरफैलावर घेणेसाठी दाखल केलेला आहे. वि.प.विरुद विना म्हणणेचा आदेश हा दि.१३.११.२०२४ रोजी पारीत करणेत आलेला आहे. सदरचा अर्ज हा गुणदोषावर निकाली निघणे अत्यंत न्याय व गरजेचे आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे संयुक्तीक नाही. जरी अर्जात नमूद केलेले कारण हे संयुक्तिक वाटत नसले तरी, प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांना संधी देणे विधीसंगत वाटते. त्यामुळे देखील संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने अर्जदाराला खर्च देणे देखील गरजेचे आहे. सदर वेळ ही जास्तीच्या कालावधीची नसल्याने सदर अर्जावर जास्त खर्च लावणे योग्य, न्याय व गरजेचे असल्याचे दिसून येत नाही. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.१२) वि.प. यांनी खर्च म्हणून अर्जदार यांना र.रू.१००/– (र.रु.शंभर फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वि.प. विरुध्द झालेला ''विना म्हणणे'' चा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.01.17 17:29:02 +0530

दि.१७/०१/२०२५ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 17/01/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 17/01/2025. |
| Judgment/order uploaded on | 17/01/2025. |